

# उन्नती

लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनचे माहितीपत्र

पहिली आवृत्ती- मे, 2024







## लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन : स्थानिकांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी कटिबद्ध

लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन (एलआयएफ) ही लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडची CSR शाखा म्हणजेच सामाजिक दायित्व निभवणारी एक शाखा आहे. एलआयएफ मध्ये, आमचा 'पीपल फर्स्ट' म्हणजेच 'लोक प्रथम' या धोरणावर विश्वास आहे. आम्ही ज्या भागात कार्य करतो, त्या भागातील लोकांप्रती सामाजिक दायीत्वाची जाणीव ठेवून काहीतरी कार्य करावे, आणि समाजावर सकारात्मक प्रभाव निर्माण करावा या हेतूने एलआयएफ ची वाटचाल सुरु झाली. लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड ज्या ठिकाणी काम करते त्या प्रदेशाचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी एलआयएफ ची स्थापना करण्यात आली.
लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (एलएमईएल) चे ध्येय हे नेहमीच आर्थिक उन्नती, रोजगार निर्मिती, कौशल्य विकास आणि सामाजिक विकासाद्वारे आमच्या कार्यक्षेत्राच्या वाढीला चालना देणे हेच राहिले आहे.
एल.एम.इ.एल टीमचा उद्देश तसेच लोकांच्या आणि प्रदेशाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी, एलआयएफ ची स्थापना 2023 मध्ये एक स्वतंत्र संस्था म्हणून करण्यात आली. तेव्हापासून सुरजागड, कोनसारी आणि घुग्गुस येथील शाखांनी शिक्षण, आरोग्यसेवा, रोजगार, महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास, पायाभूत सुविधा, क्रीडा, जलसंधारण आणि पुरवठा, शासकीय योजनांची अंमलबजावणी, विद्युतीकरण, वृक्षारोपण, हरित ऊर्जा या क्षेत्रात उपक्रम हाती घेतले. लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी एल.एम.इ.एल व्यवस्थापन वचनबद्ध आहे.
एल.एम.इ.एल चे व्यवस्थापकीय संचालक श्री. बी प्रभाकरन हे CSR उपक्रमांकडे जातीने लक्ष देतात. प्रत्येक उपक्रमाचा लोकांना आणि प्रदेशाला पूर्णपणे फायदा होईल याची खात्री करून घेतात. एलआयएफ चे उपक्रम चालविणे हा केवळ CSR चा एक भाग म्हणून अनिवार्य काम नाही, तर आपली सामाजिक दायित्व म्हणून कंपनी यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. या प्रदेशाची समृद्धी आणि लोकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी एलआयएफ मनोभावे कार्य करत आहे.
गडचिरोली हा महाराष्ट्रातील पूर्वेकडील जिल्हा. नैसर्गिक साधनसंपत्तीचा समृद्ध साठा असूनही, हा जिल्हा नेहमीच मागासलेला प्रदेश राहिला. वर्षानुवर्षे नक्षलवादामुळे हा प्रदेश मूलभूत सुविधांपासून वंचित होता. एक काळ असा होता कि गडचिरोली जिल्ह्याचा भारतातील सर्वात मागासलेला जिल्हा म्हणून उल्लेख करण्यात आला होता. नक्षलवादाच्या भीतीने मूलभूत उपक्रम वगळता औद्योगिकीकरण रोखले गेले होते. जेव्हा आम्ही सूरजागढ येथे खाणकाम सुरू करण्याचा प्रयत्न केला तेव्हा एल.एम.इ.एल ला देखील मोठ्या अडथळ्यांचा सामना करावा लागला. कंपनीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आणि सर्वसमावेशक विकासाच्या हेतूमुळे, कंपनीबद्दल लोकांचे मत हळूहळू बदलत गेले.
एलआयएफ च्या कार्यामुळे या भागातील २१ ग्रामपंचायतींचे भरघोस समर्थन कंपनीला प्राप्त झाले. या कार्याला ग्रामपंचायतींनी समर्थन दिल्यामुळे एलआयएफ ने या गावांमध्ये अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या. सूरजागडालगतच्या २१ गावांमध्येच नव्हे, तर कोनसारी आणि घुग्गुस येथे सुविधा विकसित करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जात आहेत. मागासलेपणाचा जो ठप्पा गडचिरोलीवर लागला आहे, तो पुसला जावा आणि हा जिल्हा भारताची 'न्यू स्टील सिटी' ही ओळख घेऊन पुढे यावा यासाठी एल.एम.इ.एल अहोरात्र कार्यरत आहे.



माननीय पंतप्रधानांनी गडचिरोलीचा समावेश महत्वाकांक्षी जिल्ह्याच्या यादीत केलेला आहे. हा समावेश जिल्ह्याच्या विकासाला चालना देत आहे आणि समाजातील सर्व घटकांसाठी विकास सुनिश्चित करत आहे. एलआयएफ सुद्धा या विकास यात्रेत स्थानिक लोकांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करत आहे. गडचिरोलीत आलेला पूर असो, स्थानिक क्षयरुग्णांना पोषण किट देऊन सेवा करणे असो, दिव्यांगांना आधार देणे असो, महिला आणि शेतकऱ्यांसाठी एक्सपोजर व्हिजिट घेणे असो, कुपोषित बालकांसाठी योग्य आहाराची खात्री करणे असो, किंवा रुग्णालयातील सुविधांमध्ये महिलांची योग्य प्रसूती सुनिश्चित करणे असो – सर्व कार्यांत आम्ही आघाडीवर आहोत.
पथनाट्यांद्वारे जनजागृती करणे, गावकऱ्यांसोबत महत्त्वाचे दिवस साजरे करणे, आउटरीच सेंटर्सच्या माध्यमातून विविध सरकारी योजना प्रत्यक्षपणे राबविण्यास मदत करणे, स्थानिक शेतकरी उद्योजकांना मदत करणे, स्थानिक कलाकारांना विविध माध्यमाने सक्षम करणे, स्थानिक संस्कृती आणि परंपरा यांचे जतन करणे, आणि त्यासाठी गरजेनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे ही कार्ये आम्ही करत आहोत.
रोजगारक्षम युवक घडवण्यासाठी, नाममात्र किमतीत सर्वोत्तम शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, जिल्ह्यातील दुर्गम भागापर्यंत देखील उत्तम आरोग्य सुविधा पोचवणे, स्थानिक मुलांना स्पोर्ट्स अकादमीमध्ये प्रशिक्षण देणे आणि त्यांच्यातून उत्तम खेळाडू घडविणे, हरित ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देणे, जलसंधारणाचे प्रयत्न हाती घेणे या सर्वच लोक–आधारित आणि समाज–समर्थक विकास कार्यात LIF नेहमीच आघाडीवर आहे.

### LIF च्या माध्यमातून केलेल्या उपक्रमांची थोडक्यात माहिती

- सुमारे १९००० रूग्णांवर OPD द्वारे उपचार करण्यात आले आहेत. ३४३ रूग्णांवर IPD द्वारे उपचार करण्यात आले आहेत
- १७ प्रसूती लॉईड्स काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटलमध्ये करण्यात आल्या आहेत
- लॉईड्स गारमेंट युनिटमध्ये ३२३ महिला, ज्यात ५८ प्रशिक्षक आणि २६८ प्रशिक्षणार्थी आहेत त्यांना प्रशिक्षण आणि रोजगार मिळत आहे
- ४५० हून अधिक मुले क्रीडा क्रियाकलापांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आहेत
- लॉईड्स स्पोर्ट्स अकॅडमी संघाने ६० हून अधिक पदके जिंकली आहेत;
- ३००० किलो पेक्षा जास्त ताज्या, कीटकनाशक मुक्त भाज्या थेट स्थानिक शेतकऱ्यांकडून बाजारभावापेक्षा जास्त दराने खरेदी केल्या गेल्या आहेत
- आयईएलटीएस परीक्षेत उत्तीर्ण झालेली ६ मुले त्यांच्या पुढील अभ्यासासाठी कर्टिन विद्यापीठ, पर्थ, ऑस्ट्रेलिया येथे जाणार आहेत
- क्षयरोगाविरुद्धच्या लढ्यात ४ गावांतील ६१ रुग्णांना पोषण किट मिळत आहेत
- ३ तलावातील १ लाख घन मीटर माती उत्खनन केल्याने जलस्रोतांचे पुनरुज्जीवन झाले आहे
- लवकरच सुरू होणाऱ्या लॉईड्स राज विद्या निकेतनसाठी ३२० शाळा प्रवेश अर्ज प्राप्त झाले आहेत
- ८०० लोकांना मेसन, डोझर ऑपरेटर, HMV, LMV, इत्यादी विविध रोजगाराभिमुख कौशल्ये शिकवून प्रशिक्षित केले गेले आहे
- ३००० हून अधिक लोकांना व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, सुरजागढ येथे अंतर्गत व्हील लोडर, एक्साव्हेटर, डोजर, ग्रेडर, हाउसकीपिंग इत्यादी क्षेत्रात प्रशिक्षण देण्यात आले आहे. असे अनेक उपक्रम सुरु आहेत आणि LIF च्या माध्यमातून अजून बरेच काही सुरु होणार देखील आहेत
- लोकांच्या आणि समाजाच्या भल्यासाठी झटत राहण्याच्या दूरदृष्टीने, उत्कृष्टतेच्या दिशेने प्रवास नुकताच सुरू झाला आहे. LIF च्या माध्यमातून, प्रदेशातील लोकांना शाश्वत विकासाची फळे मिळावीत आणि या प्रदेशाला लाभ मिळावा हेच आमचे अंतिम उद्दिष्ट आहे.

## संदेशः व्यवस्थापकीय संचालकांच्या कार्यालयाकडून



**नमस्कार,**

आम्हाला आमचे पहिले त्रैमासिक 'उन्नती' सुरू होत असल्याची घोषणा करताना आणि त्याचा पहिली अंक वाचकांच्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे. 'उन्नती' द्वारे लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनच्या माध्यमातून आमच्या टीमने केलेल्या कार्यांची माहिती देण्याबरोबरच, वाचनीय असा बराच मजकूर आपल्याला देण्याचा आमचा प्रयत्न असेल. ही माहिती आमच्या संस्थेतील असो वा LIF अंतर्गत आम्ही करत असलेल्या उपक्रमांबद्दल असो, आमचा मूळ उद्देश हा सर्वांना समान आणि न्याय्य संधी देणे तसेच लोकांचा आणि प्रदेशाचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करणे हाच असणार आहे. LIF ची स्थापना झाल्यापासून शिक्षण आणि कौशल्य विकास, आरोग्यसेवा, रोजगार, स्वरोजगार, पायाभूत सुविधा विकास, पर्यावरण रक्षण आणि सामाजिक कल्याण यासारख्या प्रत्येक क्षेत्रात लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. आम्ही LIF मध्ये सीएसआर (CSR) बद्दलची आमची बांधिलकी केवळ एक उपक्रम म्हणून करत नाही. प्रामाणिकपणा, आणि समाजाचा सर्वांगीण विकास या आमच्या मूलभूत मूल्यांना पूर्ण करण्याचे ते एक माध्यम असल्याचे आम्ही मानतो. आम्ही ज्या क्षेत्रात कार्य करतो त्या क्षेत्रातील जनतेला, समाजाला काहीतरी देणं लागतो अशी आमची धारणा आहे. आमच्या कार्याच्या माध्यमातून या समाजावर सकारात्मक प्रभाव पाडण्यावर आमचा विश्वास आहे. म्हणूनच या संपूर्ण प्रदेशाचे स्वरूप बदलून टाकणारे आणखी बरेच काही उप्रकम आमच्या माध्यमातून येणार आहे याची मी खात्री देतो. या त्रैमासिकात आमचे प्रत्येक कार्य प्रभावीपणे वाचकांना सादर करण्यासाठी मेहनत घेणाऱ्या आमच्या संपादकीय आणि डिझाइन टीमचे मी अभिनंदन करतो. या उपक्रमास सर्वच लोक पाठिंबा देतील आणि केवळ पहिलीच अंक नव्हे तर यापुढील प्रत्येक अंक हा आमच्या कर्मचार्यांसाठी तसेच आमच्या स्थानिक जनतेसाठी वाचनीय आणि महितीप्रद असेल अशी अपेक्षा आहे.

शुभेच्छा!

**आपला नम्र**

**बी. प्रभाकरण**

**व्यवस्थापकीय संचालक, लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड**

## उन्नती - लॉइड्स इंफिनाईट फाऊंडेशनचे तिमाही मासिक

**प्रिय वाचकांनो,**

लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन म्हणजेच LIF च्या आपल्या नवीन त्रैमासिकाचा 'उन्नतीचा ' चा शुभारंभाचा अंक आपल्या हातात देतांना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.
नावाप्रमाणेच उन्नतीचा उद्देश LIF आणि आपल्या वाचकांमध्ये अर्थपूर्ण संवाद निर्माण करून त्यांना अद्ययावत माहिती पुरवून उन्नत करणे हा आहे. या त्रैमासिकाच्या माध्यमातून, आम्ही तुम्हाला आमच्या सुरू असलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती, आमची अल्पकालीन उद्दिष्ट्ये आणि दीर्घकालीन विकासाच्या ध्येयांबद्दल अवगत करण्याचा प्रयत्न करणार आहोत. आपण जाणताच की LIF चा केंद्रबिंदू स्थानिक लोक आहेत. विविध स्थरांवरील सहयोगाद्वारे लोक सहभाग वाढविण्याकडे LIF चा कल असतो आणि त्यामुळेच आमच्या समाजाभिमुख उपक्रमांचे सकारात्मक परिणाम विविध क्षेत्रांत दिसून येतात.
आपल्या नावातील 'इंफिनाईट' म्हणजेच 'अनंत' या शब्दानुसार, उन्नती हे त्रैमासिक लोकांच्या जीवनात सकारात्मक फरक पाडण्याच्या संभावनांचे प्रतीक आहे. या पहिल्या अंकात LIF च्या शिक्षण, आरोग्य, रोजगार, क्रीडा आणि सामाजिक विकासातील बहुआयामी उपक्रमांची माहिती दिली आहे. आम्ही आकर्षक कथा आणि लेख देखील समाविष्ट केले आहेत जे तुम्हाला आवडतील अशी आमची खात्री आहे. उन्नती त्रैमासिकाच्या टीमने या पहिल्या अंकाच्या निर्मितीसाठी खात्रीशीर प्रयत्न केले आहेत. आता तुमच्याकडून या उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद आणि समर्थन मिळेल अशी आमची अपेक्षा आहे. आपण 'उन्नती' अवश्य वाचावा. आमच्या टीमला तुमचे विचार आणि सूचना कळवा. तुमच्या सूचना आणि बहुमूल्य सल्ला आमच्या भविष्यकालीन आवृत्त्यांसाठी महत्त्वाच्या असणार आहेत. आजवरच्या या प्रवासात आमच्यासोबत राहिल्याबद्दल आपले धन्यवाद. आपल्या सातत्यपूर्ण सहकार्याची आणि सहयोगाची आम्ही अपेक्षा करतो.

**खूप खूप शुभेच्छा !**

**टीम**

**लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन**

# “आउटरीच केंद्रांनी विकासाची गंगा आणली दारी”









दवाखान्यात पोहोचण्यासाठी धडपडणारी ७ महिन्यांची गर्भवती महिला, सरकारी योजनांची माहिती नसल्याने आजाराने खितपत पडलेला ७० वर्षांचा वृद्ध, आणि छोट्या छोट्या सरकारी कामासाठी लांबचा प्रवास करून तालुका मुख्यालयापर्यंत पायपीट करणारे सामान्य नागरिक – गडचिरोली जिल्ह्यातील खेड्यापाड्यांमधला हा संघर्ष आपण कित्येक वर्षांपासून बघत आलेलो आहोत. वास्तविक पाहता गडचिरोली जिल्हा नैसर्गिक साधनसंपत्तीने विपुल आहे आणि त्याची स्वत:ची आदिवासी परंपरा आणि संस्कृती आहे, परंतु गेल्या अनेक दशकांपासून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने या जिल्ह्यात अजूनही अशी अनेक गावे आहेत जिथे स्वातंत्र्याच्या सात दशकांनंतरही मूलभूत सुविधा पोहोचल्या नाहीत. लोकांची विपरीत परिस्थिती, संघर्ष आणि सततच्या दुर्लक्षामुळे, माओवादी विचारसरणीने गडचिरोलीपर्यंत आपले जाळे पसरवले होते आणि अनेक लोक नक्षल विचारसरणीकडे झुकत होते.

सरकार आणि सामाजिक भागधारकांनी नक्षलवादाचा बिमोड करून गडचिरोलीचा समतोल विकास घडवून आणण्यासाठी विविध पावले उचलली. लोकांना विकासाच्या आणि योजनांच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठाम भूमिका घेतली. यातील पहिले पाऊल म्हणजे उत्पन्न आणि उपजीविका देणारे उद्योग उभारणे. खरे म्हणजे लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडला सुरुवातीलाच एटापल्ली तालुक्यातील सुरजागढ येथे असलेल्या समृद्ध लोह खनिज खाणीसाठी भाडेतत्त्वावर ऑफर देण्यात आली होती, परंतु नक्षल समस्या आणि स्थानिकांच्या विरोधामुळे ते ऑपरेशन सुरू करू शकले नाही. अखेर रस्ते मोकळे झाल्यावर एलएमईएल सोबत त्रिवेणी अर्थमूव्हर्स प्रा. लि.ने २०२१ मध्ये कामकाज सुरू केले. यावेळी मात्र लॉईड्स चा संकल्प दृढ होता. खाणकामांसोबतच, स्थानिक लोकांना प्रशिक्षित करणे आणि त्यांना रोजगार देणे, लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि प्रदेशाचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करणे या उद्देशानेच कार्य सुरु झाले. लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन – ही LMEL ची कॉर्पोरेट सोशल रीस्पोन्सीबिलीटी शाखा या क्षेत्रात कार्यरत झाली. विविध उपक्रम सुरू करण्यात आले. स्थानिक तरुण आणि महिलांसह सर्वच लोकांना विविध कार्यांत प्रशिक्षण देण्यास प्रारंभ झाला. जड आणि हलकी चार चाकी वाहने चालविण्याचे प्रशिक्षण असो, हॉस्पिटॅलिटी असो, किंवा गवंडी काम असो, किंवा इतर बरेच काही -- लॉईड्स च्या इनहाऊस आणि साइटवर या सर्वांचेच प्रशिक्षण देण्यात आले. यासोबतच स्थापन करण्यात आले ते – आउटरीच सेंटर ! गावकरी, कंपनी आणि सरकारी प्रशासन याना जोडणारा पूल म्हणून काम करणे, माहितीचा प्रसार करणे, लोकांना जागरूक करणे आणि त्यांच्यासाठीच्या विविध योजनांबाबत त्यांना हाताशी धरून विविध सामाजिक समस्यांवर जनजागृती करणे आणि गावकऱ्यांसोबत विशेष दिवस साजरे करणे ही या आउटरीच सेंटर स्थापनेमागची कल्पना होती. गावातील समस्यांचे विश्लेषण करायचे, गावकऱ्यांच्या माध्यमातून विनंती पत्रे गोळा करायाची, पुढील अंमलबजावणीसाठी ती आवश्यक त्या शासकीय विभागाकडे सुपूर्द कार्याची, गरजेच्या वेळी प्रथम प्रतिसादकर्ता म्हणून कार्य करायचे, विशेषत: तातडीच्या वैद्यकीय परिस्थितीत, वृद्ध, गरोदर महिला आणि रुग्णालयात दाखल होण्याची आवश्यकता असलेल्यांना रुग्णवाहिका प्रदान उपलब्ध करून द्यायची, याशिवाय प्रथमोपचार, CPR या वैद्यकीय सेवा तत्काळ प्रदान करायच्या ही सर्व कामे आउटरीच सेंटरच्या माध्यमातून लीलया व्हायला लागली.

आउटरीच सेंटर चालवण्यासाठी निधी आणि पायाभूत सुविधांव्यतिरिक्त, प्रशिक्षित लोकांची आवश्यकता होती. लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन (LIF) ने संबंधित गावातील २७ व्यक्तींना निवडून त्यांना प्रशिक्षण दिले. त्यांच्यासाठी दर आठवड्याला प्रशिक्षण आणि क्षमता वाढीचे कार्यक्रम घेतले गेले. हे आउटरीच वर्कर्स कुद्री, नागुलवाडी, करमपल्ली, पेठा, एकरा खुर्द, बांदे, हेद्री, सुरजागड, पुरसलगोंडी आणि आलेंगा या १० गावांमध्ये कार्यरत आहेत. ते मिळून सुरजागड खाणींच्या परिघात वसलेल्या २१ गावांना सेवा देतात. आउटरीच वर्कर्सच्या या टीमने शासकीय लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या सुविधाचा गावकऱ्यांना सहज समजेल अशा माध्यमांद्वारे विविध गावांमध्ये प्रसार करून दिला. त्यांनी २१ गावांमधील नागरिकांचे वैयक्तिक आणि सामान्य समस्या जाणून घेण्यासाठी आधारभूत सर्वेक्षण देखील केले. रस्ते बांधणी, पिण्याचे पाणी, वीज, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, रोजगाराच्या संधी, सरकारी योजना, वैद्यकीय, शिक्षण सुविधा असे अनेक प्रश्न त्यातून पुढे आले. आउटरीच वर्कर्सच्या माध्यमातून थेट घरोघरी पोहोचणे आणि स्थानिक भाषेतील परस्पर उन्नतीद्वारे लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन टीमसाठी रणनीतीचे सूक्ष्म नियोजन करणे सोपे झाले. हेड्री येथील गारमेंट युनिटमध्ये प्रशिक्षण देण्यासाठी आउटरीच वर्कर्सच्या माध्यमातून सुमारे ३६० मुली आणि महिलांचे फॉर्म गोळा करून त्यांची छाननी करण्यात आली हे एक आदर्श उदाहरण आहे. हेड्री येथील आगामी शाळेसाठी, आउटरीच वर्कर्सच्या आणि LIF टीमच्या प्रयत्नांमुळे ६८१ पेक्षा जास्त फॉर्म भरले गेले आहेत.

आज हे प्रशिक्षित आउटरीच वर्कर्स एक महत्त्वाचा दुवा म्हणून कार्य करत आहेत. तेच गावकऱ्यांची धारणा बदलण्याचा प्रयत्न करत आहेत. गावकरी एकेकाळी त्यांच्या आजारांवर उपचार करण्यासाठी अंधश्रद्धेचा अवलंब करत होते. यामुळे अनेकांचा मृत्यू झाला तर काहींना आजारांची गंभीर बाधा झाली. आउटरीच वर्कर्सने हे आव्हान युद्धपातळीवर स्वीकारले. जनजागृती मोहीम, समुपदेशन, तपासणी शिबिरे आयोजित केली. अपघात, प्रसूती किंवा इतर कोणत्याही वैद्यकीय समस्यांच्या वेळी आउटरीच वर्कर्स सर्वप्रथम गावकऱ्यांकडे पोचायला लागले. त्यांना आधुनिक वैद्यकीय सुविधा घेण्यासाठी प्रवृत्त करायला लागले. हळूहळू याचे परिणाम दिसू लागले. गावकऱ्यांनी आधुनिक डॉक्टरांवर विश्वास ठेवला आणि रुग्णालयात उपचार घेण्यासाठी पुढे आले. त्याचप्रमाणे, LIF टीमने गावकऱ्यांना सेंद्रिय भाजीपाला पिकवण्यासाठी प्रोत्साहित करण्यास सुरुवात केली आणि टीमने थेट गावकऱ्यांकडून बाजारभावाने त्यांचे उत्पादन खरेदी केले, ज्यामुळे त्यांना उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत मिळाला. आतापर्यंत ३००० किलोहून अधिक भाजीपाला थेट खरेदी करण्यात आला असून खरेदीच्या वेळी त्यांना थेट पैसे देण्यात आले आहेत.

आउटरीच वर्कर्सच्या माध्यमातून गावपातळीवर खेळांचासुद्धा विकास होत आहे. त्यांनी केलेल्या सर्वेक्षणामुळे उन्हाळी शिबिरांचे नियोजन करण्यात मदत होत आहे. सर्व २१ गावांमध्ये क्रीडा पायाभूत सुविधाही विकसित केल्या जात आहेत. याव्यतिरिक्त, आउटरीच वर्कर्सची टीम ही लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनला विविध महत्त्वाच्या आरोग्य विषयक कार्यासाठी डेटा गोळा करण्यात मदत करते. यामुळेच कुपोषणाचा सामना करण्यासाठी योजना बनवणे, मुलींमध्ये मासिक पाळीच्या स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण करणे, त्याना सॅनिटरी नॅपकिन्स प्रदान करण्यासाठी कार्यक्रम राबविणे, यांसारखे उपक्रम यशस्वी होत आहेत. महत्त्वाकांक्षी ‘जल जीवन मिशन’ आणि ‘हर घर जल’ यासह विविध सरकारी योजनांची जनजागृती, अर्ज आणि मंजूरी या सर्व प्रक्रिया आता सहज पूर्ण होत आहेत. २१ गावांमधील २०० शेतकरी उद्योजकांचे लक्ष्य असलेला किचन गार्डन प्रकल्प देखील आउटरीच वर्कर्सच्या टीमद्वारे सक्रियपणे राबविला जात आहे. आउटरीच वर्कर्ससाठी देखील त्यांचे ज्ञान अद्ययावत करण्यासाठी विविध प्रशिक्षण सत्रे आयोजित केली जातात. या माध्यमातून त्याना त्यांची कर्तव्ये सक्षमपणे पार पाडण्यास मदत होत आहे. आउटरीच वर्कर्सच्या द्वारे केले जाणारे काम हे पूर्णपणे मनापासून केलेले जाते. *‘तुम्ही जगात जो बदल पाहू इच्छिता तो तुम्हीच असला पाहिजे’* या उक्ती प्रमाणे हे आउटरीच वर्कर्स बदलाचा चेहरा बनून कार्य करत आहेत. आशा आणि मदतीची मशाल हाती घेऊन विविध नकारात्मक पैलूंनी ग्रासलेल्या या प्रदेशासाठी ते विकासाची गंगा घरोघरी घेऊन येत आहेत. भविष्यात आउटरीच वर्कर्सच्या आणि लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या माध्यमातून केवळ हि २१ गावेच नव्हे तर लगतच्या भागांसाठी सुद्धा आउटरीच सेंटर्स बनवले जाणार आहेत, आणि या माध्यमातून या क्षेत्राचा सर्वांगीण विकास सुनिश्चित केला जाणार आहे.

# वैदू बाबाकडून आधुनिक उपचारांकडे: गडचिरोलीतील लॉयड्स काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटल आरोग्य सेवांमध्ये परिवर्तन








गडचिरोली, हा कधी तरी उपेक्षित जिल्हा होता, मात्र आता हा जिल्हा आश्चर्यकारक परिवर्तनाचा अनुभव घेत आहे. सुरजागड गाव, जे पूर्वी फक्त आयर्न ओअरसाठी प्रसिद्ध होते ते आता सामाजिक प्रगतीचे प्रतीक सुद्धा बनले आहे, याचे श्रेय अंशतः लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडला जाते. आर्थिक विकासाच्या पलीकडे, लॉईडस इंफिनाईट फाऊंडेशन स्थानिक रहिवास्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी कार्य करते आहे. हेड्री गावातील लॉयड्स काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटल (एलकेएएम रुग्णालय) हे तर या सामाजिक बदलांचे मोठे उदाहरण आहे. हे रुग्णालय एटापल्ली आणि आसपासच्या परिसरातील लोकांना आवश्यक आरोग्य सेवा प्रदान करते. पूर्वी, गावकरी आजारांवर पारंपारिक उपचार करणारे वैदू किंवा घरघुती उपचारांवर अवलंबून असत. यामुळे अनेकदा गंभीर आजारांवर उपचार होत नसत आणि अनेकांचे मृत्यू होत. लॉईड्स चे व्यवस्थापकीय संचालक श्री बी. प्रभाकरण यांचे स्वप्न होते कि या भागात सुद्धा सामान्य लोकांना तज्ञ डॉक्टरांचा समावेश असलेले सुसज्ज रुग्णालय उपलब्ध झाले पाहिजे. या इस्पितळासाठी जमीन अधिग्रहणापासून ते बांधकामापर्यंत, सर्वकाही लॉईड्सच्या टीमने लोकसहभागातून केले. प्रारंभी काही गावकऱ्यांना आधुनिक वैद्यकीय पद्धतीचा स्वीकार करण्यास संकोच वाटत होता. परंतु लॉईड्सच्या टीम हळूहळू स्थानिकांचा विश्वास संपादन केला. उच्च-गुणवत्तेचा मोफत उपचार, तसेच आहार आणि वैद्यकीय गरजांची काळजी घेतल्याने हे रुग्णालय आता लोकांसाठी आशेचा किरण बनले आहे. आता तर एलकेएएम रुग्णालय तीन ग्रामपंचायत आणि एक नगरपंचायतिच्या गावांसाठी एक दीपस्तंभ बनले आहे.नोव्हेंबर 2023 मध्ये सुरू झालेले, एलकेएएम रुग्णालय समाजाच्या वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी समर्पित आहे. हेड्री सारख्या लहानश्या गावात 30 खाटांची सुविधा, अत्याधुनिक ICU आणि अत्यावश्यक सेवा, प्रसूती सेवा, दंतचिकित्सा, नेत्रशल्यक्रिया, सामान्य वैद्यकीय सेवा आणि बालरोग सेवांसह इतरही वैद्यकीय सेवा प्रदान करते. डिजिटल X-ray, सोनोग्राफी आणि 24/7 प्रयोगशाळा सेवांसह अत्याधुनिक निदान सुविधा देखील उपलब्ध आहेत. रुग्णालयाचे आहारतज्ञ, फिजिओथेरपिस्ट तसेच २४ तास चालणारे सुसज्जित औषधालय रुग्णांची काळजी घेत असतात. एलकेएएम रुग्णालय सुलभतेला प्राधान्य देते. अत्यावश्यक वैद्यकीय सेवा, सामान्य वैद्यकीय सेवा, स्त्रीरोगविज्ञान, प्रसूतिशास्त्र आणि बालरोगासाठी पूर्ण वेळ डॉक्टर उपलब्ध आहेत. याव्यतिरिक्त ऑर्थोपेडिक, ईएनटी स्पेशिअलिस्ट, जनरल सर्जन, त्वचारोग विशेषज्ञ, दंतचिकित्सक आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील अनुभवी तज्ञ या इस्पितळाला नियमित भेटी देत असतात आणि वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करतात. रुग्णालयाची समर्पित टीम प्रत्येक रुग्णाला वैयक्तिक सेवा प्रदान करण्याचा प्रयत्न करत असते. दररोज सरासरी 100-150 रुग्ण या रुग्णालयाला भेट देतात आणि आरोग्य सुविधांचा लाभ घेतात. लॉयड्स काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटल गडचिरोलीतील बदलत्या आणि प्रगतीशील जीवनाचा दाखला देत उभे आहे. गडचिरोलीच्या निरंतर विकासाचा आधारस्तंभ असणाऱ्या मजबूत आरोग्य सेवा प्रणालीची ही तर फक्त एक सुरुवात आहे.

# आदिवासी भूमी ते जागतिक व्यासपीठापर्यंत लॉईड्स ने केलेय विद्यार्थ्यांना जागतिक शिक्षणासाठी सक्षम





फोटो कॅप्शन: IELTS कोचिंगसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांची पहिली तुकडी, त्यांचे शिक्षक आणि कर्मचारी. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना कर्टिन विद्यापीठ, पर्थ, ऑस्ट्रेलिया येथे पुढील शिक्षण घेण्याची संधी मिळेल.

लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (एलएमईएल) फक्त गडचिरोली येथे खाणकाम करण्यावर लक्ष केंद्रित करत नाही तर त्यांची सीएसआर शाखा, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन (एलआयएफ) द्वारे ते या स्थानिकांच्या दीर्घकालीन विकासासाठी सुद्धा वाचनबद्ध आहेत. स्थानिकांच्या विकासाठी एलआयएफ विविध उपक्रम राबवत आहे यातील त्यांचा एक प्रमुख उपक्रम म्हणजे 'कर्टीन युनिव्हर्सिटी' - परदेशात शिक्षणासाठी प्रतिभावान विद्यार्थ्यांची निवड करणे, आणि त्यांना उत्तम कौशल्यांसह सक्षम बनविणे हा आहे.

या उपक्रमा अंतर्गत एलआयएफने सुरजागड खाणी जवळील गावांमधून बारावी बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झालेले आणि परदेशात शिक्षणासाठी इच्छुक असलेले १४ विद्यार्थी निवडले. एलएमईएलचे एमडी श्री. बी. प्रभाकरण यांच्या मार्गदर्शनात या विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षेत्रात सर्वोत्तम शिक्षण देण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सक्षम केले गेले.

जागतिक पातळीवरील माहिती आणि उद्योगासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करण्यासाठी थेट ऑस्ट्रेलियाच्या पर्थमधील कर्टिन विद्यापीठ येथे शिक्षणाची स्वप्नवत संधी त्यांना प्राप्त झाली.

निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षण, जेवण आणि राहण्याचा सर्व खर्च एलआयएफने केला. प्रारंभिक प्रशिक्षणात इंग्रजी उन्नती, बोलीभाषा आणि ऑस्ट्रेलियाच्या चालीरीतींवर लक्ष केंद्रित करण्यात आले, ते नागपूर येथे झाले. पुढील कौशल्य विकास नोएडा येथे झाला. सहा विद्यार्थ्यांनी आयएलटीएस परीक्षा उत्तीर्ण केली, आणि कर्टिन विद्यापीठात त्यांची जागा निश्चित केली. हे होतकरू आणि हुशार विद्यार्थी आहेत:

- इग्नेशियस बाडा (Master of Innovation & Entrepreneurship। मास्टर ऑफ इनोव्हेशन अँड इंटरप्रिनरशिप )
- शिल्पा महा (Bachelor of Business Administration । बॅचलर ऑफ बिझिनेस ऍडमिनिस्ट्रेशन )
- राहुल नरोती (Bachelor of Commerce । बॅचलर ऑफ कॉमर्स )
- शुभम गोता -(Diploma of Health Science – Bachelor of Science । डिप्लोमा ऑफ हेल्थ सायन्स - बॅचलर ऑफ सायन्स )
- अजित कोरामी - (Diploma of Health Science – Bachelor of Science । डिप्लोमा ऑफ हेल्थ सायन्स - बॅचलर ऑफ सायन्स )
- सुप्रिया शंभरकर [Diploma of Enineering – Bachelor of Enineering (Honors) Mining डिप्लोमा ऑफ इंजिनिअरिंग -बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग (होनर्स) ]

या विद्यार्थ्यांना त्यांच्या निवडलेल्या क्षेत्रानुसार अतिरिक्त प्रशिक्षण देण्यात आले. अनुभवी प्रशिक्षकांनी व्यक्तिगत लक्ष प्रदान केले, शैक्षणिक आणि वैयक्तिक प्रश्नांचे निराकरण केले.

या सर्व उपक्रमांसह वेळेचे व्यवस्थापन, अभ्यास कौशल्ये आणि तणाव व्यवस्थापन या तंत्रांचे देखील प्रशिक्षण मुलांना दिले गेले. सातत्याने वैयक्तिक मार्गदर्शनाद्वारे या विद्यार्थ्यांनी आयएलटीएस परीक्षेसाठी त्यांचे ऐकणे, बोलणे, वाचन आणि लेखन हि कौशल्ये सुधारली. श्रीमती पूनम भसीन सहनान यांच्या नेतृत्वात, अनु मॅडम आणि तृप्ती मॅडम यांच्या सहकार्याने तसेच सर्व तज्ज्ञांनी दिलेल्या प्रशिक्षणाच्या जोरावर हे विद्यार्थी आता स्वतःच्या, त्यांच्या कुटुंबाच्या आणि गावाच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी तयार आहेत. आदिवासी भूमीपासून जागतिक स्तरापर्यंतचा त्यांचा प्रवास गडचिरोलीसाठी एक नवा अध्याय आहे.

# डोंगरदऱ्यातून थेट क्रीडांगणापर्यंतः लॉईड्स स्पोर्ट्स अकॅडमी करत आहे गडचिरोलीतील मुलांना सक्षम




लहानपणी शाळा संपली आणि सुट्टी लागली कि आपण सगळे धाव घ्यायचो ती मैदानावर! एके काळी प्रत्येक शालेय विद्यार्थी कुठल्या ना कुठल्या एका खेळात तरी प्राविण्य मिळवत असे. मात्र गडचिरोली हा असा भाग आहे जेथे विद्यार्थ्यांना मुलभूत शैक्षणिक सुविधांसाठी देखील संघर्ष करावा लागतो. अश्यावेळी सह-शैक्षणिक क्रियाकलाप किंवा क्रीडा सुविधांची या क्षेत्रात खूपच वानवा होती.

ही समस्या लक्षात घेऊन लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड यांनी त्यांच्या CSR शाखा असलेल्या लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन (LIF) द्वारे लॉईड्स स्पोर्ट्स अकॅडमी (LSA) ची स्थापना केली. या प्रदेशातील तरुणांची क्षमता ओळखून, LIF ने खेळाडूंद्वारे सर्वांगीण व्यक्तीत्व निर्माण करण्याचे ध्येय ठेवले आहे. २०२३ मध्ये, LSA ने आपल्या कार्याला सुरुवात केली. सुरुवातला एथलेटिक्स, तीरंदाजी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी आणि आत्मरक्षण या खेळांचा समावेश होता. प्रारंभी, ३० मुलांनी उन्हाळी शिबिरात सहभाग घेतला. या मुलांच्या गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, वाहतूक, किट आणि आहाराची व्यवस्था LIF द्वारे करण्यात आली. आता अधिकाधिक मुलांपर्यंत पोहोचण्यासाठी अकादमीचा विस्तार झालेला आहे. नुकतीच LMEL च्या कोनसरी येथील कारखान्याच्या जवळ सुविधा तयार करण्यात आली आहे. येथे २० पेक्षा जास्त अनुभवी प्रशिक्षकांची एक टीम आहे. यापैकी अनेक जन राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभागी झाले आहेत. आज हे तज्ञ प्रशिक्षक या आदिवासी विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रभावीपणे प्रशिक्षण देत आहेत. कठोर परिश्रम, निष्ठा आणि जीव लावून कार्य करणारे प्रशिक्षक असल्यामुळे या मेहनतीचे फळ सुद्धा मिळायला सुरुवात झाली आहे. सहा महिन्यांच्या आत, LSA च्या विद्यार्थ्यांनी नागपूर येथे झालेल्या खासदार क्रीडा महोत्सवात उत्कृष्ट कामगिरी केली. या महोत्सवात राज्याभरातील २००० पेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या महोत्सवात क्रीडांगणात, अंडर-१८, अंडर-१४ आणि मॅराथॉन रन मध्ये मोनिका मडावी, निलीमा मेश्राम आणि नागेश्वर रसाळ (LSA चे विद्यार्थी) यांनी सुवर्ण आणि कांस्य पदके मिळवली. हे यश LSA साठी एक मैलाचा दगड ठरले. आपल्या सहकाऱ्यांच्या यशामुळे प्रेरणा घेऊन अधिकाधिक मुले LSA मध्ये नोंदणी करू लागली. आज, कृष्णार, हेड्री आणि कोनसरी या जवळच्या गावांमधून ३५० पेक्षा जास्त मुले अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत आहेत.

हेड्री, कृष्णार आणि कोनसरी या गावांमध्ये अकॅडेमीच्या माध्यमातून प्रत्येकी २ एकर क्षेत्रफळात अत्याधुनिक क्रीडा प्रशिक्षण सुविधा उभ्या करण्यात आलेल्या आहेत. येथे १७ पेक्षा जास्त अनुभवी प्रशिक्षक येथे गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देत आहेत. खेळाडूंच्या सर्व गरजा लक्षात घेऊन स्पोर्ट्स किट्स, साहित्य, आहार, प्रवास आणि स्पर्धेचा खर्चही अकॅडेमीच करते. रुढार्थाने दुर्गम अश्या या भागात सध्या अथेलेटिकस, आर्चरी, फुटबॉल , व्हॉलीबॉल, मिनी गोल्फ, कबड्डी, सेल्फ डिफेन्स इत्यादी खेळांचे प्रशिक्षण देण्यात येते.

विविध खेळांचे कसब शिकविण्यासाठी विविध पिट्स आणि ट्रॅकस, आर्चरी फिल्ड, व्हॉलीबॉल कोर्ट , कबड्डी कोर्ट, फुटबॉल फिल्ड, सेल्फ डिफेन्स साठी विशेष व्यवस्था अशा सोयी येथे उपलब्ध आहेत. येथील खेळाडूंनी महिला-पुरुष मिळून आतापर्यंत ६४ मेडल्स जिंकले आहेत. यात ५० जिल्हास्तरीय मेडल्स , ४ विभागीय स्तरीय मेडल, ९ राज्य स्तरीय तर १ राष्ट्रीय स्तरीय मेडल्सचा समावेश आहे. विजेत्यांची ही संख्या उत्तोरोत्तर वाढत आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक स्पर्धांचे आयोजनही केले जाते. लॉईड्स चे संचालक श्री. प्रभाकरण आणि लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ. कीर्ती रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली अकॅडेमीची घोडदौड सुरु आहे. गडचिरोलीच्या स्थानिक युवांना आंतरराष्ट्रीय खेळाडू बनवण्याचं स्वप्न त्यांनी पाहिलेलं आहे. मात्र लॉईड्स स्पोर्ट्स अकॅडेमी हे फक्त खेळाचे मैदान नाही, तर स्वप्नांना उंच उड्डाण देणारे व्यासपीठ आहे. खेळामधून शिस्त, सहकार्य, नेतृत्वगुण विकसित होऊन समाजाचे चांगले नागरिक यातून घडणार आहेत. खेळाच्या नियमित सरावामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राखण्यात नव्या पिढीला यश मिळणार आहे. खेळातील गुणवत्तेच्या आधारे सरकारी आणि खासगी क्षेत्रात नोकरीच्या संधी देखील उपलब्ध होणार आहेत. याशिवाय खेळातील यशाच्या आधारे क्रीडा कोट्यातून चांगल्या संस्थांमध्ये शिक्षण घेण्याची संधी अनेकांना उपलब्ध होणार आहे! मुलांच्या कोवळया मनात क्रीडा क्षेत्राबद्दल गोडी निर्माण करून त्यांचे भविष्य उज्ज्वल करण्याचे हे व्रत आहे.









## गारमेंट युनिट














# आशेची वीण : गडचिरोलीतील महिलांचे सक्षमीकरण

गडचिरोली – नैसर्गिक साधनसंपत्तीने विपुल पण तरीही अविकसिततेने ग्रासलेला जिल्हा . हा जिल्हाल पिढ्यानपिढ्या रोजगाराच्या संधी आणि मर्यादित उत्पन्नाच्या समस्यांतशी झगडतो आहेत. तेंदूपत्ता आणि शेती सारख्या पारंपारिक उपजीविकेमुळे केवळ तुटपुंजे उत्पन्न मिळत असतानाच दारू आणि नक्षलवादाचे सावट असलेल्यिा या जिल्ह्याउतील कुटुंबे आजही दारिद्र्याने ग्रासलेली आहेत.

मात्र, सरकारी धोरणे, पोलिस व निमलष्कररराद्वारे केले जात असलेले सुरक्षेचे प्रयत्न आणि औद्योगिक उपक्रम यांच्यो एकत्रित प्रयत्नालतून या प्रदेशाच्या उन्नतीसाठी परिवर्तनाची गंगा प्रवाही होऊ लागली आहे. या प्रयत्नांमध्ये लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (एलएमईएल) परिवर्तनाचा दीपस्तंभ म्हणून उदयास आली आहे. त्यांनी गडचिरोलीच्या सुरजागड लोहखनिज खाण आणि कोनसरी स्टील प्लांटमध्ये कामकाज सुरू केले. एलएमईएलची सीएसआर शाखा,) लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनच्या लोकांच्या माध्यसमातून येथील लोकांच्या जीवनात सुधारणा आणण्यासाठी आणि या क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली गेली आहेत.

व्यवस्थापकीय संचालक श्री. बी. प्रभाकरण आणि एलआयएफच्या संचालिका कीर्ती रेड्डी यांनी स्थानिक महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक मिशन हाती घेतले आणि अशारितीने गडचिरोलीच्या एटापल्ली तालुक्यातील हेड्री गावात लॉईड्स गारमेंट युनिटचा जन्म झाला. मात्र, हे स्वप्न साकार करणे म्हयणजे एक मोठे आव्हाान होते.

सुरवातीलाच संशयाच्या भोवऱ्यात सापडलेल्या या प्रकल्पासाठी २१ गावांमध्ये व्यापक जनजागृती करण्याची गरज होती. अनेक अडथळे आणि अधूनमधून विरोधाचा सामना करीत असताना देखील टीमचे सातत्यपूर्ण व कठोर परिश्रम आणि समर्पणाचे फळ अखेर मिळाले आणि ५८ महिलांनी ट्रेनर्स (ToT) प्रशिक्षण कार्यक्रमात प्रवेश घेतला. यामुळे एका अशा परिवर्तनशील प्रवासाला सुरुवात झाली, जिथे स्त्रियांना व्यावहारिक विविध कौशल्ये शिकविण्या बरोबरच त्यांना येथील कामासाठी पूर्णतः तयार करण्योत आले. तात्पुरत्या सेटअपमध्ये सुरुवातीपासूनच अत्याधुनिक यंत्रसामुग्री आणि तज्ज्ञ प्रशिक्षकांचा समावेश केला गेल्यासने या गारमेंट युनिटला उच्चआतम दर्जा प्राप्तव झाला.

परिणामस्वरूप, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्वांवलंबन वाढविणे, समाजातील दुर्गुण कमी करणे आणि स्थानिक महिलांमध्ये आकांक्षा जागृत करणे आदी सकारात्मंक बदल घडून आले.

जुलै २०२४ पर्यंत हे युनिट पूर्ण क्षमतेपर्यंत विकसीत होण्याच्या मार्गावर असताना, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा विस्तार आणि प्रशिक्षणार्थींसाठी उद्योजकतेच्या संधींसह अनेक महत्त्वाकांक्षी योजना आखल्या जात आहेत. या युनिटची आणि पर्यायाने महिलांच्या सक्षमीकरणाची ही यशोगाथा असून स्थानिक पातळीवर शिवलेल्या कपड्यांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढत असून त्यांची प्रशंसाही होत आहे. हे या क्षेत्रासाठी आशादायी भविष्याचे संकेत आहेत.

या परिवर्तनशील प्रवासात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांसाठी भविष्यात भरपूर संधी आहेत. ठराविक गावांतील महिला प्रशिक्षणासाठी येथे अर्ज करू शकतात. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य आणि सामुदायिक उन्नतीचा मार्ग त्यिामुळे आता खुला झाला आहे. निर्धार आणि सबलीकरणाची ही वीण गडचिरोलीतील महिलांचे भविष्य धागा-धागा जोडून अधिक घट्ट होत आहे.

# भविष्य निर्माण: कौशल्य विकासाद्वारे मनुष्यबळ आणि समुदायाचे सक्षमीकरण






आजच्या गतिमान आणि स्पर्धात्मक जगात केवळ औपचारिक शिक्षण किंवा एखादी पदवी, व्यावसायिक क्षेत्रात यश मिळेलच याची शाश्वती देत नाही. उद्योगाच्या मागणीच्या अनुषंगाने कौशल्यांचा सतत विकास करत राहिल्यास व्यक्ती प्रगती आणि यशाकडे वाटचाल करू शकतो. भारताचा जागतिक पातळीवरील वाढता प्रभाव आणि विविध क्षेत्रांचे भारतीय प्रतिभांवरचे वाढत असलेले अवलंबित्व, यामुळे कुशल मनुष्यबळाची मागणी कधी नव्हे इतकी वाढली आहे. भारताची उत्साही आणि मोठ्या प्रमाणात असलेली युवा जनसंख्या बघता ही निकड आणखी वाढली आहे. त्यामुळे शिक्षण आणि कौशल्य विकास उपक्रमांमध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता भासू लागली आहे.ही गरज ओळखून, केंद्र व राज्य सरकार महत्त्वपूर्ण पावले उचलत असून विविध धोरणे आणि कार्यक्रम आखत आहे. त्याचबरोबर, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रे कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी सारख्या प्रयत्नांसह सर्व संस्थात्मक स्तरावर कौशल्य विकास उपक्रमांना प्राधान्य देताना दिसत आहेत. तंत्रज्ञानाधारित बाजारपेठ आणि उद्योग ४.० च्या वाढत्या मागणीनुसार लोक स्वतःला सज्ज करत आहेत. कौशल्य संपादन करण्याचे महत्त्व स्पष्ट करताना जिम रोहन म्हणतात, 'आपण हातोड्याने झाड कापू शकतो. पण त्यासाठी कमीत कमी 30 दिवस तरी लागतात. जर आपण हातोड्याऐवजी कु-हाड घेतली तर तर तेच झाड सुमारे 30 मिनिटांत कापता येईल. 30 दिवस आणि 30 मिनिटे यामधील फरक म्हणजेच कौशल्य आहे.' लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (एलएमईएल) मध्ये, कौशल्य आणि कौशल्याचा विकास यावर अधिक भर देण्यात आलेला आहे. कारण कर्मचारी आणि कंपनी यांच्या यशात सातत्यपूर्ण शिक्षणाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे, यावर संस्थेचा ठाम विश्वास आहे. स्थानिक समुदायाचे कौशल्य विकसीत करणे असो किंवा विविध पदांवर काम करणा-या कर्मचा-यांच्या क्षमता वाढविणे असो, एलएमईएल बदलत्या बाजारपेठेच्या गतिशीलतेशी जुळवून घेण्यास वचनबद्ध आहे. अवजड मशिनरी ऑपरेशनपासून ते इलेक्ट्रिशियनचे काम आणि संगणकातील प्राविण्य यासारख्या तांत्रिक व्यवसायांपर्यंत, प्रशिक्षणात अशा विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे.सुरजागड येथील एलएमईएलच्या व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरमधील अभ्यासक्रमात व्यावहारिक प्रशिक्षणाचा देखील समावेश करण्यात आलेले असून त्याद्वारे प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकास साधला जातो. अशोक लेलँड आणि विवेकानंद पॉलिटेक्निक सारख्या प्रतिष्ठित संस्थांच्या सहयोगाने उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यात हे सेंटर आघाडीवर आहे. लैंगिक समावेशकतेला चालना देण्यास एलएमईएल समर्पित असून स्त्रिया उत्खनन आणि डंपर ऑपरेशनसारख्या पारंपारिक पुरुषप्रधान कामांमध्ये सक्रियपणे सहभाग घेताना दिसतात. कोअर मायनिंग ऑपरेशन्समध्ये महिलांच्या सहभागासाठी अनुकूल वातावरण तयार करण्याचे प्रयत्न असून ते एलएमईएलची वैविधता आणि सर्वसमावेशकता, याचे ते द्योतक आहे. लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनचे हे व्यापक प्रयत्न सहभागी समुदायाला गुंतवून ठेवण्यात आणि त्यांचा कौशल्य विकास अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश सुलभ करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. गावागावांमध्ये असलेल्या आउटरीच सेंटरमुळे तेथील व्यक्तींना प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या आकांक्षांशी सुसंगत अशा कार्यक्रमांमध्ये नावनोंदणी करण्यासाठी अतिशय सुलभ असा मार्ग खुला झाला आहे.

# शाश्वत विकासाद्वारे समुदायांना जोडणारा सेतू















प्रादेशिक विकासामध्ये पायाभूत सुविधा हा घटक महत्त्वाचा ठरत असतो. या पायाभूत सुविधांमुळे कनेक्टिव्हिटी तर वाढतेच, शिवाय सर्वांगीण समृद्धीलाही चालना मिळते. दीर्घकाळ अविकासाचे बिरुद माथ्यावर घेऊन फिरणारा गडचिरोली हा भाग आता राष्ट्रीय स्तरावर प्रकाशझोतात येत आहे. विपुल नैसर्गिक सौंदर्य, कला आणि संस्कृतीचा अनोखा संगम असलेल्याा गडचिरोलीमध्ये भारतातील काही उत्कृष्ट लोह खनिज साठे असून त्यामुळे 'स्टील सिटी ऑफ इंडिया' अशी नवी ओळख निर्माण होण्याची शक्यवता निर्माण झाली आहे.

लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (एलएमईएल) ने सुरजागड येथे आपले काम सुरू केल्यानंतर लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन (एलआयएफ) अंतर्गत सीएसआर उपक्रमांद्वारे समाजाच्यास विकासासाठी व्यापक योगदान देण्याची एक स्पष्ट अशी दृष्टी विकसीत झाली आहे. परिसरातील २१ गावांमध्ये रस्ते बांधणी, वीज जोडणी, बोअरवेल, हातपंप बसविणे, ओव्हरहेड टँक प्रकल्प, कम्युनिटी हॉल आणि तलावांचे पुनरुज्जीवन अशा पायाभूत सुविधांचा विकास करणे, हे एलआयएफचे मुख्य उद्दीष्ट आहे. गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील दुर्गम माडिया आदिवासी वस्ती असलेल्या मोहर्ली गावात विद्युतीकरण प्रकल्प सुरू झाले आहेत. बेसलाईन सर्व्हेक्षणात सर्व ४८ घरांसाठी ६५ किलो वॅटचा ट्रान्सफॉर्मर, ६७ विजेचे खांब आणि विजेचे मीटर बसविण्याचा मार्ग मोकळा झाल्याने मोहर्ली गावाच्या विकासाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. हल्लूर गावाचे विद्युतीकरण करण्यासाठी एलआयएफ महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने काम करीत आहे. सरकारी शाळांमध्ये बोअरवेल, पाईपलाईन दुरुस्ती, पाण्याच्या टाकीची देखभाल, पाईपलाईन व हातपंप बसविणे यांसारख्या पायाभूत सुविधांची देखभाल व दुरुस्ती यासारखे अनेक प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहेत. याशिवाय, अनेक गावांमध्ये तलवातील गाळ काढणे आणि ओव्हरहेड पाण्याच्या टाक्या बसविण्याचे काम हाती घेण्यात आले असून, त्याची नियमित देखभाल करण्यात येत आहे. मांगेर गावच्या तलावातील केवळ गाळ काढणेच नव्हे, तर पाथवे, बसण्याची जागा, बगीचा, सोलर लायटिंग आणि बदक व मत्सपालनाच्या सोयीसुविधांनी सुशोभित केले जात असून, त्याचे रूपांतर आकर्षक पर्यटन स्थळात व्हावे आणि या परिसराचे सौंदर्य वाढावे, या उद्देशाने येथील तलावाचे सुशोभीकरण करण्यात येत आहे.

स्थानिक कार्यक्रम आणि सभांच्या आयोजनासाठी बांडे आणि हेड्री गावात कम्युनिटी हॉल बांधण्यात येत आहेत. ड्रेनेज, पथदिवे, पिण्याच्या पाण्याची सुविधाही गावोगावी उपलब्धे करून देण्या चा मानस आहे. आणखी दोन तलावांमधील गाळ काढणे आणि सात अतिरिक्त ओव्हरहेड टाक्या बसविण्याचे नियोजन आहे. पायाभूत सुविधा हा प्रादेशिक विकासाचा पाया आहे आणि आजुबाजुच्या गावांमध्ये उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आम्हीा कटिबद्ध आहोत. इतर क्षेत्रांबरोबरच, पायाभूत सुविधांचा विकास हा आमच्यात अजेंड्यावर असून त्याहमुळे हा प्रदेश विकासाच्या नव्या युगात प्रवेश करेल, असा विश्वास लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनला आहे. गावांमध्ये कनेक्टिव्हिटी निर्माण करून त्यांच्या वृद्धी आणि समृद्धीसाठी सर्वांगीण सुविधा प्रदान करून वर्षानुवर्षांपासून विकासात येणारे अडथळे दूर करण्याचा एलआयएफचा प्रामाणिक प्रयत्न आहे.



# आपल्या माणसांमध्ये गुंतवणूक: लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लि.चा परिवर्तनकारी प्रवास







लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी ली. (एलएमईएल) ने गडचिरोली जिल्ह्याच्या मध्यभागी वसलेल्या एटापल्ली तालुक्यातील सुरजागढ लोह खनिज खाणी येथे काम सुरू केले आणि एकेकाळी केवळ पारंपारिक उपजीविकेने समाजाच्या अस्तित्वाची व्याख्या केल्या जाणाऱ्या या क्षेत्राचा परिवर्तनाचा प्रवास सुरू झाला. लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लि. ची त्यामागे महत्वाकांक्षी दृष्टी होती. स्थानिक लोकांचा कौशल्य विकास करणे आणि त्यांना समर्थ बनवणे, त्यांना अर्थपूर्ण रोजगाराच्या संधी देऊ करणे जणेकरून त्यांच्या जीवनाला आकार देता येऊ शकेल, हे त्यामागे उद्दिष्ट होते. मात्र, हे काम जिकिरीचे होते. या ठिकाणच्या अनेक पिढ्या उद्योग – मोठे व्यवसाय यांच्या शिवाय जगलेल्या होत्या. पारंपारिक व्यवसायांमधून कॉर्पोरेट रोजगाराकडे जाताना त्यांच्यासमोर बहुविध आव्हाने होती. बऱ्याच स्थानिकांचा औपचारिक शिक्षण आणि व्यावसायिक वातावरणाशी संबंध नव्हता, उन्नती कौशल्य नव्हते, शिवाय, कामाच्या ठिकाणी शिष्टाचार आणि अगदी वैयक्तिक ग्रूमिंग करण्या पर्यंत अशामध्ये सर्वसमावेशक प्रशिक्षणाशी आवश्यक सर्व बाबी विचारात घ्याव्या लागल्या. सुरुवातीच्या गाठीभेटी आमच्यासाठी डोळे उघडणाऱ्या ठरल्या. प्रशिक्षण सत्रांमध्ये केवळ नोकरी-केंद्रित कौशल्यच नव्हे तर कामासाठी योग्य पोशाख घालणे यासारख्या मूलभूत बाबींचा समावेश करण्यात आला. हळूहळू, चिकाटी आणि समर्पणामुळे, उल्लेखनीय परिवर्तने घडून आली. अनौपचारिक पोशाख परिधान करण्यापासून ते औपचारिक पोशाख स्वीकारण्यापर्यंत आणि अनिवार्य सुरक्षा प्रोटोकॉलचे पालन करण्यापर्यंत, हा प्रवास केवळ बाह्य बदलांचा नव्हे तर मानसिकतेत होत जाणारा बदल दर्शविणारा ठरला. याशिवाय, मादक द्रव्यांचा दुरुपयोग, एकेकाळी याठिकाणी प्रचलित होता. जागरुकता मोहिमेद्वारे आणि कठोर धोरणांद्वारे या विषयाला देखील संबोधित केले गेले, ज्यामुळे कामाच्या ठिकाणी चांगले आणि आरोग्यदयी वातावरण निर्माण होऊ शकले. एलएमईएलची सर्वांगीण विकासाची वचनबद्धता तांत्रिक प्रशिक्षणाच्या पलीकडे विस्तारली गेली. व्यक्तिमत्व विकास, प्रभावी उन्नती आणि वर्तणूक शिष्टाचार यामधील कार्यक्रम लागू केले गेले, ज्यामुळे व्यक्तींना विविध भूमिका आणि परिस्थितींमध्ये उत्कृष्ट बनण्यास सक्षम करण्यात आले. स्थानिकांना आर्थिक मुख्य प्रवाहात सामावून घेण्याच्या संकल्पावर कंपनीचे नेतृत्व एमडी श्री. बी. प्रभाकरण हे कायमच ठाम राहिले. त्याचे सकारात्मक परिणाम संपूर्ण परिसरात दिसून आले. जसजसा व्यक्तींना रोजगार मिळत गेला, तसतशी स्थानिक अर्थव्यवस्थांची भरभराट झाली, ज्याचा पुरावा मोटारसायकलच्या विक्रीतील वाढ आणि राह-णीमानात सुधारणा यातून मिळाला. आज, गडचिरोलीतील 2,200 हून अधिक व्यक्तींना एलएमईएलमध्ये विविध भूमिका आणि जबाबदाऱ्या पार पाडून रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

एलएमईएलने माणसांमध्ये केलेली गुंतवणूक ही केवळ रोजगारापुरती मर्यादित नसून त्याहीपलीकडे आहे. यामध्ये आरोग्यसेवा, शिक्षण आणि मनोरंजनात्मक उपक्रमांचा अशा सर्वसमावेशक कल्याणकारी आराखड्याचा समावेश आहे. भविष्य निर्वाह निधीच्या फायद्यांपासून ते भक्कम आरोग्य सुविधा आणि कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी दर्जेदार शिक्षण, अक्षय सर्वांगीण कल्याणाच्या प्रत्येक बाबींना प्राधान्य दिले गेले आहे.

शिवाय, एलएमईएल सर्वसमावेशक कार्य संस्कृतीला प्रोत्साहन देते, महिलांसाठी समान संधी सुनिश्चित करते आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि अनुकूल सुविधा प्रदान करते. योग सत्रे, व्यायामशाळा सुविधा आणि मनोरंजनात्मक क्रियाकलाप कर्मचाऱ्यांमध्ये शारीरिक आणि मानसिक निरोगीपणाला प्रोत्साहन देतात.

संघटनात्मक वाढ त्याच्या कर्मचाऱ्यांच्या सक्षमीकरणाशी आणि कल्याणाशी निगडीत आहे हे ओळखून एलएमईएल 'पीपल फर्स्ट' संकल्पनेचे समर्थन करते. कंपनी यशस्वीतेकडे प्रवास करत असताना, ती केवळ उत्पादक म्हणूनच नाही तर तिच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी वैयक्तिक आणि व्यावसायिक वाढीस चालना देणारे कार्यस्थळ तयार करण्यासाठी समर्पित आहे. गडचिरोलीमध्ये, एलएमईएलची कहाणी केवळ कॉर्पोरेट कथा नाही तर त्यापेक्षा अधिक आहे – ती माणसांमध्ये गुंतवणूक करण्याच्या परिवर्तनीय शक्तीचा पुरावा आहे. कौशल्य विकास, सशक्तीकरण आणि सर्वसमावेशक समर्थनाद्वारे, एलएमई-एलने केवळ जीवनच बदलले नाही तर समुदायांच्या शाश्वत विकासाला चालना दिली आहे.

# स्थानिक युवकांचे सक्षमीकरण: लॉईड्स राज विद्या निकेतनचा ग्रामीण शिक्षणप्रवास

एटापल्ली तालुक्याच्या मध्यभागी पायाभूत सुविधा आणि संधींचा अभाव असलेले गाव आहे, त्याचे नाव आहे हेड्री. या भागात अनेक आव्हाहने आहेत. दर्जेदार शिक्षण आणि सर्वांगीण बालविकासाच्या मर्यादित सुविधांसाठी मागील अनेक वर्षांपासून येथील नागरिकांचा झगडा सुरू आहे, पण आता सरकारी संस्था, कायद्याची काटेकोर अंमलबजावणी, सामुदायिक भागधारक आणि लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (एलएमईएल) यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे या भागात एक परिवर्तनशील प्रवाह वाहू लागला आहे.

एलएमईएलने लोककल्याकारी शाखा लॉईड्स इनफिनाईट फाऊंडेशनच्या माध्यमातून स्थानिक समुदायाच्या उन्नतीचे मिशन हाती घेतले आहे. लॉईड्स राज विद्या निकेतन (एलआरव्हीएन) म्हणजे ग्रामीण भागातील मुलांच्या जीवनात क्रांती घडवून आणणारा आशेचा किरण आहे. केवळ शैक्षणिक कौशल्यापेक्षाही अधिक देण्यासाठी कटिबद्ध असलेले एलआरव्हीएन ग्रामीण भागातील युवामनात जीवनकौशल्ये आणि उद्योजकतेची भावना रुजविण्यासाठी समर्पित आहे. एलआरव्हीएनसाठी





शैक्षणिक उत्कृष्टता हे केवळ एक स्वप्न नसून वास्तव आहे. येथील सुसज्ज वर्गखोल्या आणि प्रशिक्षित शिक्षकांची फौज मुलांमध्ये शिकण्याची आवड जोपासण्यासठी सातत्याने प्रयत्नशील असते. अमर्याद संधी उपलब्ध करून देण्यावर येथे भर दिला जातो. शिवाय, समाजात शाश्वत प्रगतीला चालना देण्यासाठी प्रयत्न केले जातात. नाविन्यपूर्ण शिक्षण, सामुदायिक सहभाग आणि आधुनिकतेशी परंपरेची सांगड घालणाऱ्या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून एलआरव्हीएन, सातत्याकने विकसित होत असलेल्या जगात यशस्वी होण्यासाठी सज्ज राहण्यासाठी युवापिढीचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रयत्नशील आहे.

ब-याच काळापासून दर्जेदार शिक्षणाच्या अभावामुळे वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासात अडथळे निर्माण झाले होते. त्यामुळे स्थानिकांना त्यांचे शिक्षण, उद्योगधंदे मध्येतच सोडून द्यावे लागत होते किंवा शहरांमध्ये धाव घ्यावी लागत होती. ग्रामीण भागातील या गरजा ओळखून एलएमईएलचे व्यवस्थापकीय संचालक श्री. बी. प्रभाकरण यांच्या पुढाकाराने एलआरव्हीएनची स्थापना करण्यात आली आणि स्थानिक मुलांना बेजोड संधी देणाऱ्या परिवर्तनशील शैक्षणिक संस्थेची नीव ठेवली गेली. सुरजागड लोहखनिज खाणींच्या १५ किलोमीटरच्या परिसरात असलेल्या तीन ग्रामपंचायतींसाठी एलआरव्हीएन म्हणजे शैक्षणिक प्रगतीचे एक उत्तम माध्यम बनले आहे. सर्वसमावेशक के-१२ अभ्यासक्रम उपलब्ध करून देणारी ही या परिसरातील सीबीएसई संलग्नित पहिली इंग्रजी माध्यमाची शाळा असून ती मौलाचा दगड ठरली आहे. पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिकच विद्यार्थ्यांसाठी जून २०२४ मध्ये वर्ग सुरू होणार असून प्रत्येक वर्गात ४० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. कर्मचारी, बिगर कर्मचारी आणि आर्थिकदृष्ट्या मागास पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबांतील ३२० विद्यार्थ्यांच्या प्रवेशामुळे या शैक्षणिक संस्थेची आश्वासक सुरुवात झाली आहे. भविष्याात, १२०० विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचे एलआरव्हीएनचे उद्दिष्ट असून, सहावी ते बारावीच्या ६०० विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सर्वांना समान दर्जाचे शिक्षण उपलब्धा करून देणे हे एलआरव्हीएनचे उद्दिष्ट आहे.

शिक्षणापलीकडे, एलआरव्हीएन सर्वांगीण विकासास देखील प्राधान्य देते, संगीत, नृत्य, नाटक, कला, क्रीडा, खेळ आणि योग यांचा समावेश असलेल्या सह-अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रमेतर विषयांचे देखील येथे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

लवचिक आणि संपन्न नेतृत्वाच्या मार्गदर्शनात एलआरव्हीएन पदवीधरांना स्थानिक समाज आणि राष्ट्राच्या हितासाठी कार्य करण्यायसाठी प्रेरित करत आहे. एलआरव्हीएन शैक्षणिक उत्कृष्टतेचे एक केंद्रच बनू इच्छित नाही तर चारित्र्य निर्मितीचे व्यासपीठ, विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यास सक्षम व्यक्तींना घडवण्याचे आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे विद्यापीठ बनू पाहत आहे.

# कुटी ते कुटीर उद्योग: कुक्कुटपालनाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण



लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशन (एलआयएफ) या अविकसीत प्रदेशाचे कल्याणासाठी आणि स्थानिक रहिवाशांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी समर्पित आहे. स्थानिक महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांना शाश्वत उपजीविका उपलब्धन करून देण्यातवर भर देण्यात येत आहे. हेड्री गावातील लॉईड्स गारमेंट युनिटमध्येज ३०० हून अधिक महिलांना प्रशिक्षण आणि रोजगार देण्याकत आला, हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणता येईल. याव्यतिरिक्त, सीएसआर टीमने उपलब्ध योजना आणि उत्पन्न देणा-या उपक्रमांबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी अनेक गावांमध्ये बेसलाइन सर्वेक्षण केले आहे. या सर्वेक्षणादरम्यान असे लक्षात आले की, अनेक कुटुंबे आपल्यो घरीच कोंबड्या पाळतात. परंतु त्यांच्या संगोपनासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि यंत्रणा यांचा येथे अभाव आहे.

यावर तोडगा काढण्यासाठी टीमने विविध गावातील महिलांसोबत उन्नती साधला आणि त्यांच्या उदर-निर्वाहाचा पर्याय म्हणून कुक्कुटपा-लनासारख्या कुटीरउद्योगाच्या संभाव्यतेवर चर्चा केली. या सत्रांच्या माध्यमातून ३० हून अधिक महिलांना कुक्कुटपालनाचे फायदे आणि त्यामुळे त्यांच्या घरगुती उत्पन्नात होणारी लक्षणीय वाढ, यासंदर्भात माहिती देण्यात आली. त्यानंतर चंद्रपूरच्या मुल तालुक्याला भेट देण्यात आली. येथील महिलांना प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे कुक्कुटपालना-बद्दल माहिती देण्यात आली. सीएसआर टीमच्या नेतृत्वाखाली आणि चंद्रपूर येथील पोल्ट्री बिझनेस स्पेशालिस्ट अक्षय यांच्या मार्गद-र्शनात झालेल्या् या भेटीत कुक्कुट-पालनासारख्या कुटीर उद्योगाची उभारणी आणि व्यवस्थापनाविषयी त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. स्वतःचा कुक्कुटपालन व्यवसाय सुरू करण्यास उत्सूक असलेल्या महिलांसाठी ही भेट प्रबोधनात्मक ठरली. या उपक्रमामुळे महिला आणि त्यांच्या कुटुंबियांची उपजीविका सुधारणार असून खेड्यापाड्यातील इतरांनाही त्याचे अनुकरण करण्याची प्रेरणा मिळणार आहे. हा उपक्रम भविष्यालत ग्राम सबलीकरणाचे एक जीवंत उदाहरण ठरू शकेल.




# स्थानिक शेतकऱ्यांना बळकटी आणि कर्मचाऱ्यांना आरोग्यपूर्ण भोजन

**लॉईड्सचा उपक्रम** शेतापासून थेट जेवणाच्या टेबलापर्यंत : शेतकऱ्यांचे सक्षमीकरण



लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन (एलआयएफ) स्थानिक शेतकऱ्यांना पाठींबा आणि स्वयंरोज-गाराची संधी उपलब्ध करून देत आहे. याचे सकारात्मक परिणाम सुद्धा दिसायला लागले आहेत. यातील एका प्रमुख उपक्रम म्हणजे स्थानीक शेतकऱ्यांना ताज्या, रसायन-मुक्त भाज्या पिकवण्यासाठी आणि विकण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढवण्यावर भर देणे.

एलआयएफ टीमने प्रथम ग्रामस्थांना या कार्यक्रमाचे फायदे समजावून सांगून त्यांना माहिती दिली. सुरुवातीला त्यांना असलेल्या शंका आणि संशयांवर योग्य समुपदेशन करून मात करण्यात आली आणि तीन महिन्यांच्या आत, १० गावांमधून २० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी या उपक्रमात सहभाग घ्यायचं नक्की केलं. एलआयएफ टीमने त्यांना सुरुवात करण्यासाठी आवश्यक मदत पुरवली.

हे सहकार्य यशस्वी ठरले. वांगी, भोपळा, कोथिंबीर आणि इतर पालेभाज्या यांसह ३००० किलोपेक्षा जास्त भाज्यांची काढणी करण्यात आली आणि बाजारभावापेक्षा जास्त दरात थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आली. या ताज्या, आरोग्यदायी भाज्यांचा वापर लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लि. च्या भोजनालयात केला जातो, ज्यामुळे कर्मचार्यांना स्थानिक शेतकऱ्यांनी पिकवलेली आणि विषमुक्त आणि आरोग्यदायी भाजी उपभोगण्याचा आनंद मिळतो .मात्र या उपक्रमाचे लाभ यापेक्षा बरेच अधिक आहेत. येत्या काही महिन्यांत २१ गावांमध्ये २०० भाजीपाला बागा स्थापन करण्याचे महत्वाकांक्षी ध्येय घेऊन एलआयएफ च्या या कार्यक्रमाची वाटचाल सुरु आहे. यातूनच स्थानिक शेतकऱ्याला आरोग्यदायी भविष्यासाठी सक्षम बनवले जात आहे.



# हेड्री आणि कोंसारी गावांना मिळाल्या त्यांच्या पहिल्या बँका







आर्थिक समावेशकतेच्या दृष्टीने हेड्री आणि कोनसरी गावांनी आर्थिक सक्षमीकरणाच्या नव्या युगाची सुरुवात केली आहे. गडचिरोली जिल्हा केंद्रीय सहकारी बँक लिमिटेड (जी. डी. सी. सी.) आणि लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (एल. एम. ई. एल.) यांच्यातील सामंजस्यामुळे रहिवाशांना आता त्यांच्या स्वतःच्या अंगणातच महत्त्वपूर्ण वित्तीय सेवा उपलब्ध आहेत. या गावांमध्ये जी. डी. सी. सी. बँकेच्या 56 व्या आणि 57 व्या शाखांचे उद्घाटन त्यांच्या समृद्धीच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. सामुदायिक विकास आणि प्रगतीसाठी सामायिक वचनबद्धतेचे प्रतीक म्हणून श्री. बी. प्रभाकरण आणि श्री. अरविंद पोरेड्डीवार यांनी संयुक्तपणे बँकांचे उद्घाटन केले. एल. एम. ई. एल. चे व्यवस्थापकीय संचालक श्री. बी. प्रभाकरण यांच्या दूरदर्शी नेतृत्वाने हा उपक्रम साकारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या अविचल पाठिंब्यामुळे आणि प्रोत्साहनामुळे या बँकांच्या स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आणि स्थानिक वित्तीय संस्थांना बळकटी देण्याचे महत्त्व अधोरेखित झाले. बँका आणि सरकारने देऊ केलेल्या विविध फायदेशीर योजनांचा लाभ घेण्याच्या महत्त्वावरही प्रभाकरण यांनी भर दिला आणि गावकऱ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना या प्रदेशाच्या प्रगतीसाठी या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष आणि जी. डी. सी. सी. बँकेचे अध्यक्ष अरविंद पोरेड्डीवार आणि जी. डी. सी. सी. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश ऐलवार यांच्यासह सन्माननीय व्यक्तींच्या उपस्थितीने या कार्यक्रमाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. ग्रामीण विकास आणि आर्थिक समावेशकतेसाठीचा त्यांचा सामूहिक दृष्टीकोन संपूर्ण समारंभात प्रतिध्वनित झाला, ज्यामुळे स्थानिक लोकांमध्ये आशा आणि आशावाद निर्माण झाला. या कार्यक्रमाला एल. एम. ई. एल., लॉईड्स इनफिनाईट फाऊंडेशन (एल. आय. एफ.) आणि जी. डी. सी. सी. बँकेच्या प्रतिनिधींसह हेड्री आणि कोनसरी गावांतील प्रमुख व्यक्ती उपस्थित होत्या. त्यांच्या उपस्थितीने या उपक्रमाला चालना देणारी सहकार्याची भावना अधोरेखित केली आणि समुदायांना सक्षम बनविण्याच्या आणि सामान्य लोकांच्या जीवनात मूर्त बदल घडवून आणण्याच्या वचनबद्धतेला बळकटी दिली. हेड्री आणि कोनसरी यांनी वित्तीय सेवांमध्ये नव्याने मिळवलेल्या प्रवेशाचा स्वीकार करत उज्ज्वल आणि अधिक समृद्ध भविष्याच्या दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी तयार असल्याचे अधोरेखित केले. हा महत्त्वपूर्ण प्रसंग भागीदारीच्या परिवर्तनशील शक्तीचा पुरावा म्हणता येईल आणि जेव्हा भागधारक समान ध्येयाच्या शोधात एकत्र येतात तेव्हा सकारात्मक बदलाची क्षमता अधोरेखित होते.

# परंपरांचे सक्षमीकरण : आदिवासी कला व संस्कृतीचे जतन




गडचिरोलीला आदिवासी कला, संस्कृतीचा समृद्ध वारसा लाभला आहे. या वारसाचे जतन आणि संवर्धन करण्यालचे ध्येय लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनच्या टीमने सीएसआर उपक्रमाद्वारे निश्चित केले आहे. या प्रदेशाच्या सर्वांगीण विकास साधत असताना, येथील मूलभूत सुविधांचा विकास आणि शिक्षण, आरोग्य, रोजगार, महिला सक्षमीकरण, पायाभूत सुविधा, क्रीडा आणि कौशल्य विकास करत असतानाच या भागातील परंपरा जपण्यासचादेखील त्यासमागे प्रमुख उद्देश आहे. रेला नृत्यम हे असेच एक सांस्कृतिक ठेव असून हे लोकनृत्य आदिवासी बांधव प्रत्येक आनंदाच्या प्रसंगी सादर करतात. युवक आणि वयोवृद्धांद्वारे सादर होत असलेल्या या लोकनृत्या गावपातळीवर स्पर्धा आयोजित करून, तसेच, या भागातील परंपरांवर आधारित कॉफी टेबल बुक तयार करून आणि त्यासाठी त्यांना लागणारे साहित्य पुरवून आणि सरकारी योजनांचा लाभ देऊन नृत्य कलावंतांना पाठबळ देण्याचा एलआयएफचा प्रयत्न आहे. या परंपरा, कला आणि संस्कृती केवळ जतनच करणे हेच फाउंडेशनचे उद्दीष्ट नसून त्यांचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचार-प्रसार व्हावा, भावी पिढ्यांपर्यंत हा ठेवा पोहोचवता यावा, यासाठी फाऊंडेशन प्रयत्नरत आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून एलआयएफने एटापल्ली तालुक्यातील पेठा गावात आदिवासी कला आणि संस्कृती कार्यक्रमाचे आयोजन केले. त्याुची मध्यावर्ती संकल्पंना आदिवासी कला आणि संस्कृती संवर्धन आणि प्रचार कार्यक्रम ही होती. गावातील स्थानिक मान्यवर आणि पाहुण्यांनी या उपक्रमाला मनापासून पाठिंबा दिला आणि सहभाग घेतला. तरुण पिढीतही तेवढाच उत्साह दिसून आला. प्रमुख पाहुणे साधू देव कोरामी, अध्यक्षा वनिता कोरामी आदी वक्त्यांनी यावेळी आदिवासी संस्कृती, कला व साहित्याचे जतन व संवर्धन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी पेठा गावातील रेला नृत्य कलाकारांनी पारंपरिक वेशभूषेत नेत्रदीपक सादरीकरण केले. वयोवृद्ध महिलांनी गाणी व नृत्य केले, तर आदिवासी मुलींनी सुंदर सांस्कृतिक नृत्य सादर केले. मान्यवरांच्या हस्ते आदिवासी रेला गटांना विविध रेला वाद्यांचे वितरण करण्यात आले. ज्येंष्ठ कलावंतांनी आपली कला आणि संस्कृती पुढच्या पिढीपर्यंत पोचवून तिचे अस्तित्व टिकविण्याची गरज वक्त्यांनी यावेळी प्रतिपादिली. लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनचे डीजीएम - सीएसआर, दिलीप बुराडे यांच्या मार्गदर्शनात वरिष्ठ अधिकारी देवेंद्र हिरापुरे आणि सहाय्यक अधिकारी मंगल मशाखेत्री यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रसिकांनी या कार्यक्रमाला भरभरून दाद दिली. स्पर्धकांना पारितोषिके व प्रमाणपत्रे वितरीत करण्यांत आली. विकास आणि परंपरा सामंजस्याने एकत्र राहू शकतात, हा विश्वास असल्यामुळेच एलआयएफने स्थानिक परंपरा आणि संस्कृतीचे समर्थन आणि संवर्धन करण्यासाठी प्रयत्न आरंभले आहेत.


## Join our incredible team at Lloyds Infinite Foundation!

A vibrant workplace with immense potential for personal and professional rowth. A leadin company with the best of the facilities for employees and committed to a positive social chane. Yes, all these you can experience at Lloyds Infinite Foundation, the CSR arm of Lloyds Metals & Enery Ltd. - a listed and leadin company in the field of minin and steel. We are invitin passionate individuals to join our vibrant team and contribute to the rowth of our community.

We currently have excitin opportunities available in various roles for dedicated professionals who are ready to embark on a fulfillin career journey.

**Healthcare Sector –**

**Radioloist/Sonoloist**
Qualification: MBBS - MS/MD, DMRE, DMRD
Preferred Experience: 0-2 years
Location: Hedri, Etapalli.

**Orthopaedician**
Qualification: MBBS - MS/MD (Ortho.)
Preferred Experience: 0-2 years
Location: Hedri, Etapalli.

**Medical Officer**
Qualification: MBBS
Preferred Experience: 0-3 years
Location: Hedri, Etapalli.

**Nursin (Neonatal ICU only)**
Qualification: B.Sc. (Nursin)
Preferred Experience: 3-5 years
Location: Hedri, Etapalli.

**First Aid Nursin**
Qualification: B.Sc.
Preferred Experience: 2-5 years
Location: Surjaarh Iron Ore Mines, Etapalli.

**Education Sector–**

**Librarian**
Qualification: M. Lib.
Preferred Experience: 3-4 years
Location: Hedri, Etapalli.

**Music Teacher**
Qualification: B.Ed. (Music)
Preferred Experience: 4-8 years
Location: Hedri, Etapalli.

**IT Support Executive**
Qualification: Bachelor's Deree in IT, Computer Science or Information Systems.
Preferred Experience: 2-3 years
Location: Hedri, Etapalli.




**Garment Unit –**

**1. Accounts Executive**
Qualification: A bachelor's deree in accountin, finance, or a related field.
Preferred Experience: 3-5 years
Location: Hedri, Etapalli.

**2. Accounts Assistant Manaer**
Qualification: A bachelor's deree in accountin, finance, or a related field.
Preferred Experience: 3-6 years
Location: Hedri, Etapalli.

**Store Manaer**
Qualification: Bachelor's or Master's deree.
Preferred Experience: 8-10 years (Preferred from arment Industry)
Location: Hedri, Etapalli.

**4. Electrical Enineer**
Qualification: Diploma in Electrical Enineerin.
Preferred Experience: 2-5 years.
Location: Hedri, Etapalli.

**Interested? Email your updated resume to skv@lloyds.in**

Join us at Lloyds Infinite Foundation and be part of a community-driven oranization dedicated to makin a positive impact in everyone's lives. Let's make the impact toether!


CMYK